| MHOS020007852026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९२/२०२६<br>श्रीमंत दिगंबर गायकवाड व इतर वि. निरंक |
|---|---|

## निशाणी क्र.१ वरील आदेश

## (अधिघोषीत दिनांक ०९/०७/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अक्ट १८२७ मधील कलम २ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी सादर केला आहे.

२. अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे –

अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत **पगाबाई दिगंबर गायकवाड** यांचे अर्जदार क्र. १ व २ मुले आहेत. **पगाबाई दिगंबर गायकवाड** हे दिनांक २४/१२/१९७१ रोजी ताकविकी, ता.जि.धाराशिव येथे मयत झालेले आहेत. तसेच त्यांचे पती पुर्वीच मयत झालेले आहेत. मयत **पगाबाई दिगंबर गायकवाड** यांना प्रस्तुत अर्जदार यांचेशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांना कायदेशीर वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज दिला आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर दि. १६/०५/२०२६ रोजीचे 'दैनिक संघर्ष' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली आहे. सदर वर्तमानपत्राची प्रत **नि.१०** वर दाखल आहे. पगाबाई दिगंबर गायकवाड यांचे मृत्यु प्रमाणपत्र **नि.११** कडे आहे. अर्जदार हनुमंत दिगंबर गायकवाड यांचे साक्षांकीत आधारकार्ड **नि.१२** कडे आहे.

४. उपरोक्त वर्तमानपत्रामधील जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेकडून अर्जदार हे मयत **पगाबाई दिगंबर गायकवाड** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप असलेस जाहीर प्रगटन काढून आक्षेप मागविणेत आले. परंतु आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

५. अर्जदार क्र.२ यांनी **नि. ९** कडे अर्जदारांकरीता अर्जामधील कथनांच्या पुष्ठ्यर्थ सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. मुळतःच अर्जास कोणीही आक्षेप घेतला नसल्याने त्यांचा सरतपास अबाधीत राहीला आहे. शपथपत्रातील कथने खोटी आढळल्यास त्याबाबतच्या शिक्षेस

ते पात्र राहतील.

**६.** उपरोक्त केलेल्या विवेचनाचा साकल्याने विचार करता अर्जदार क्र. १ व २ हे मयत **पगाबाई दिगंबर गायकवाड** यांचे कायदेशीर वारस असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले आहे. त्यामुळे अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र. १ व २ हे मयत **पगाबाई दिगंबर गायकवाड** यांचे सरळ व कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

Digitally signed by JONDHALE SWATI SURESHRAO
Date: 2026.07.09 15:04:05 +0530

**(श्रीमती एस.एस. जोंधळे)**

दिनांक –०९.०७.२०२६

३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
उस्मानाबाद